महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती
# महाराष्ट्र जनशक्ती
मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १७१ वे | दिनांक : १६/०६/२०२६ | वार : मंगळवार

## जयपूरमध्ये अभिजीत दीपके यांना मारहाण : सुषमा अंधारे व विश्वंभर चौधरींकडून घटनेचा तीव्र निषेध





**मुंबई :** नीट पेपरफुटी, ढासळलेली शिक्षण व्यवस्था आणि बेरोजगारी यांसारख्या तरुणांच्या प्रश्नांवर जयपूर येथील 'शहीद स्मारका'वर आयोजित मोठ्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी आलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दीपके यांना दोन तरुणांनी थप्पड मारल्याची घटना घडली आहे. या प्रकारानंतर संतप्त झालेल्या सीजेपीच्या समर्थकांनी त्या दोन्ही तरुणांना पकडून मारहाण केली. या आंदोलनादरम्यान मोठ्या प्रमाणावर गोंधळाचे वातावरण पाहायला मिळाले.

या घटनेपूर्वीही घोषणाबाजी करत असताना काही तरुण आपापसात भिडल्याने पोलिसांनी एकाला ताब्यात घेतले होते. याशिवाय, धरणेस्थळावरून अनेक आंदोलकांचे मोबाईल चोरीला गेल्याच्या घटना उघडकीस आल्याने, अखेर व्यासपीठावरून सर्वांना आपले मोबाईल सुरक्षित ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या.

या घटनेवर शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी एका वृत्तवाहिनीला प्रतिक्रिया दिली आहे. त्या म्हणाल्या, मला असे वाटते की आंदोलन कोणाचेही असो, सत्ताधाऱ्यांचे असो किंवा विरोधकांचे असो. मात्र ज्या पद्धतीने या हिंसक कारवाया घडतात याचे कोणीही समर्थन करू शकत नाही. त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे आणि तो मिळालाही पाहिजे. जर काही देशविघातक कृत्य होत असेल तर त्याला सरकार आळा घालेल न. पण ज्या अर्थी पोलिस प्रशासनाने तसेच सरकारने आंदोलनाची परवानगी दिली आहे, तर तिथे सुरक्षेचा प्रश्न पाळलाच गेला पाहिजे.

यावर सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, हे जर असे झाले असेल तर खरोखर अत्यंत दुर्दैवाची परिस्थिती आहे. दरम्यान, विश्वंभर चौधरी हे अभिजीत दिपके यांच्या पुण्यातील आंदोलनाच्यावेळी सोबत होते.

अभिजीत दिपके यांनी सुरू केलेल्या या पक्षाच्या सुरुवातीपासून चौधरी यांनी दिपके यांच्या या आंदोलनाला तसेच त्यांच्या पक्षाला पाठिंबा दिला आहे.

## शिवसेना ठाकरे गटात फुटीची चर्चा ?



**पुणे :** महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या घडामोडींना वेग आलाय. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत संभाव्य फुटीच्या चर्चांनी जोर धरला आहे. उद्धव ठाकरे यांनी नुकतीच पक्षाच्या खासदारांची तातडीची बैठक मातोश्रीवर बोलावली होती. या बैठकीला ९ पैकी ५ खासदारांनी ऑनलाइन हजेरी लावली. बैठकीनंतर सर्व खासदार पक्षासोबत असल्याचा दावा ठाकरे गटाने केला. मात्र, काही खासदार नव्या गटाच्या स्थापनेच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. यावर शिवसेना ठाकरे गटाचे युवा नेते व आमदार आदित्य ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत माहिती दिली आहे. ते म्हणाले, मला वाटते की आपण अफवांवर विश्वास ठेऊ नये. उद्धव साहेब आणि मी, आम्ही एक पथ्य पाळले आहे की जे आमच्यासोबत असतात त्यांच्यावर आम्ही अंधविश्वास ठेवतो. काही काही लोक अंधभक्त असतात, आम्ही अंधविश्वास ठेवणारे लोक आहोत.

पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, सगळे खासदार जे काही निवडून आले आहेत २०२४ च्या लाटेमध्ये उद्धव साहेब प्रत्येक मतदारसंघात गेले आहेत. आम्ही असू, पवार साहेब असती आम्ही सगळ्यांनी प्रचार केला होता. लोकांनी मशाल या चिन्हावर निवडून आणले आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे कालच्या आमच्या बैठकीत आपण पाहिले असेल सगळेच लोक तिथे उपस्थित होते, काही ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते आणि सगळे सोबत आहेत. तसेच ऑनलाइन येण्यात चुकीचे काय? असा सवालही आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला.

काही खासदार फुटू शकतात, अशी शक्यता वर्तवली जात आहे. यावर बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, आपण पाहिले असेल की तृणमूल कॉंग्रेसमधले २० खासदारांनी वेगळा गट तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. हे सगळे एहसान फरामोश लोक आहेत. जिंकले ममता दीदींच्या नावावर आणि आता लगेच उड्या मारून पळत आहेत. एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे की आमची केस आता ४ वर्ष झाले चालू आहे, राष्ट्रवादीची सुद्धा सुरू आहे. तसे पाहायला गेले तर ही फार मोठी घटना आहे की एखादा पक्ष चोरून त्याचे नाव आणि चिन्ह देऊ शकते. आमचे म्हणणे एकच आहे की लोकशाही नष्ट होताना दिसत आहे का? असा सवाल ठाकरेंनी उपस्थित केला.

एकाच राजकीय गोष्टीवर चिटकून न राहता, महाराष्ट्रात अनेक विषय आहेत, देशात अनेक विषय आहेत त्यावर देखील आपण चर्चा केली पाहिजे, असे आदित्य ठाकरे म्हणाले. पुढे ते म्हणाले, पक्ष तोडण्याच्या या ज्या गोष्टी आहेत ते देशात सगळीकडे सुरू आहे. आपण जगातली सर्वात मोठी लोकशाही होतो, आता आहेत असे वाटत नाही. आपण लोकांच्या प्रश्नावर बोलले पाहिजे, राजकारणावरच बोलत बसलो तर लोक आम्हाला मूर्ख समजतील.

शेतकरी कर्जमाफीच्या प्रश्नावर बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, आम्ही २०१९ साली जे केले त्याला आम्ही कर्जमुक्ती म्हंटले होते. माफी कोणाला करतात गुन्हेगारांना, शेतकरी गुन्हेगार आहेत का? आम्ही कर्जमाफी न म्हणता तेव्हा कर्जमुक्ती म्हटले होते. आम्ही कुठल्याही अटी शर्थी न लावता आम्ही सरळ सेवा सुरू केली होती. आत्ता जी कर्जमाफी आहे ती उपकार केल्यासारखी आहे. म्हणजे एका बाजूला आपण पाहतोय की जवळपास ८५ लाख महिलांचे जे काही लाडकी बहीण योजनेतले पैसे होते ते वळवले आहेत असे दिसत आहे. म्हणजे ८५ लाख महिलांचा वापर केला, मतदान घेतले आणि आता सोडून दिले, त्यांना अपात्र ठरवण्यात आले. त्यातून आता हे कर्जमाफी करत आहेत.

पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, पुण्यातील वेताळ टेकडीचा विषय आहे, गणेश खिंडीचा विषय आहे, नद्यांचा प्रश्न आहे, हे सगळे विषय आम्ही अधिवेशनात मांडणार आहोत. मी पर्यावरण मंत्री असताना मी शाश्वत विकास करणार होतो. सरकार असो किंवा नसो हे करण्यासाठी मी आताही प्रयत्न करणार आहे.

## 'साहेब येणार'च्या नुसत्या अफवेनेच राज्यातील बाजारपेठांना कुलूप

**बुलढाणा :** राज्यातील कडक शिस्तीचे आणि धडाडीचे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी राज्याच्या अन्न आणि औषध प्रशासन (FDA) विभागाच्या आयुक्तपदाची सूत्रे हाती घेताच धडक कारवाईचा सपाटा लावला आहे. त्यांच्या या कठोर कार्यपद्धतीचा राज्यभर एवढा धसका घेण्यात आला आहे की, केवळ ते तपासणीसाठी येणार असल्याच्या अफवेनेच मोठ्या बाजारपेठा काही मिनिटांत कुलूपबंद होत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

याचेच एक ताजे उदाहरण बुलढाणा जिल्ह्यात पाहायला मिळाले. मेहकर तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या डोणगाव येथे सोशल मीडियावर 'एफडीएचे साहेब तपासणीसाठी येणार' असा एक मेसेज वाऱ्यासारखा पसरला. या केवळ एका मेसेजमुळे व्यापाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आणि काही मिनिटांतच संपूर्ण बाजारपेठ बंद झाली. कारवाईच्या भीतीने किराणा व मिठाईच्या दुकानांसह पानटपऱ्या आणि हॉटेल चालकांनीही आपली दुकाने तातडीने बंद करून तेथून पळ काढला.

तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार अन्न आणि औषध प्रशासनाने आपला मोर्चा आता ग्रामीण भागाकडेही वळवला आहे. या धडक कारवाईचा धसका घेत अनेक छोटे-मोठे व्यावसायिक, हॉटेल चालक, तसेच किराणा आणि मिठाईच्या दुकानदारांनीही आपली दुकाने बंद करून पळ काढण्यातच धन्यता मानली. विशेषतः भेसळ करणारे आणि अवैध मार्गाने व्यवसाय करणारे व्यापारी आता चांगलेच धास्तावले असून, साहेबांच्या कारवाईच्या भीतीने त्यांनी आपले व्यवसाय बंद ठेवण्यास पसंती दिली आहे.

अवैध गुटखा, पानमसाला आणि तंबाखूजन्य पदार्थांची सर्रास विक्री करणाऱ्या पानटपरी चालकांमध्ये तर आयुक्त मुंढे यांच्या पथकाची मोठी दहशत निर्माण झाली आहे. रविवारी परळीमध्ये एफडीएचे पथक कारवाई करणार असल्याची बातमी वाऱ्यासारखी संपूर्ण बीड जिल्ह्यात पसरली. या बातमीनंतर संभाव्य कारवाईचा बडगा आपल्यावरही उगारला जाईल, या भीतीने बीडमधील बहुतांश पानटपरी चालकांनी कारवाई होण्यापूर्वीच आपल्या टपऱ्यांना कुलूप ठोकले आणि तिथून काढता पाय घेतला.राज्यात अवैध गुटखा आणि पानमसाला विक्रीला आळा घालण्यासाठी आयुक्त तुकाराम मुंढे यांनी एक ऐतिहासिक आणि अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. यापुढे गुटख्याचे बेकायदा उत्पादन करणाऱ्या मोठ्या माफियांपासून ते अगदी किरकोळ विक्री करणाऱ्या पानटपरी चालकांपर्यंत सर्वांवर थेट 'मोक्का' अंतर्गत धडक कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश त्यांनी प्रशासनाला दिले आहेत. मुंढे यांच्या या अभूतपूर्व निर्णयामुळे राज्यात सर्रासपणे चालणाऱ्या अवैध गुटखा व्यवसायाला मोठा हादरा बसला असून, या कडक पावलामुळे गुटखा माफियांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १६ जून २०२६


## मांडवा येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू निदान शिबिराचे जेईएस महाविद्यालय जालना तर्फे आयोजन

**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** जेइएस महाविद्यालय जालना च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे व श्री गणपती नेत्रालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने मांडवा ता. बदनापुर जिल्हा~ जालना येथे दि. १६जून २०२६ मंगळवार रोजी सकाळी ८.३० वाजता मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू निदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे याकरिता मांडवा, परिसरातील गरजू ग्रामस्थांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री यांनी केलेले आहे .या शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. किशोर तापडिया, प्रा.योगेश लाहमटे, डॉ. राजेश सरकटे डॉ. आर एस सोनवणे आदी उपस्थित राहून रुग्णांची संवाद साधणार आहेत, श्री. गणपती नेत्रालयातील तज्ञ डॉक्टरांची टीम तर्फे नेत्र तपासणी व मोतीबिंदू निदान यावेळी करण्यात येणार आहे. मांडवा येथील सरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य यांनी याप्रसंगी उपस्थित राहण्याचे ग्रामस्थांना आवाहन केलेले आहे.

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या वर्धापन दिनी नाट्यरसिकांसाठी विशेष पर्वणी

**नाशिक :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठात उद्या मंगळवार, दि. १६ जून २०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता 'इथेच टाका तंबू' या नाटकाचे विद्यापीठाच्या आवारातील धन्वंतरी सभागृहात आयोजन करण्यात आले आहे. या दोन अंकी नाटकाची निर्मिती यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ललित कला केंद्र यांनी केली आहे. झी नाटय गौरव आणि सांस्कृतिक कलादर्पण गौरव रजनी पुरस्कारांनी सन्मानित असलेले हे नाटक विद्यापीठाचे मा. कुलगुरु प्रा. संजीव सोनवणे (अतिरिक्त कार्यभार) यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आले आहे.याप्रसंगी विद्यापीठाचे मा. कुलगुरु प्रा. संजीव सोनवणे (अतिरिक्त कार्यभार) यांनी सांगितले की, विद्यापीठाचा २८ वा वर्धापन दिन हा आपल्या सर्वांसाठी अभिमानाचा क्षण आहे. शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रातील कार्यासोबतच कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या मानसिक विरंगुळयासाठी आणि त्यांचा कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा दर्जेदार सांस्कृतिक प्रयोगांचे आयोजन करण्यात आले आहे असे त्यांनी सांगितले.या नाटकाचे लेखक दत्ता पाटील असून दिग्दर्शक सचिन शिंदे आहे. कलाकार ओंकार गोवर्धन, आश्विनी कासार, अमेय बर्वे आणि उमेश जगताप आहेत. संगीत ऋषिकेश शेलार यांनी दिले असून पार्श्वसंगीत ऋषिकेश गांगुर्डे यांनी केले आहे. प्रकाशयोजना प्रणव सपकाळे व निखिल मारणे हे करणार असून प्रकाशयोजना सहाय्य योगेंद्र साने हे करणार आहेत. नेपथ्य विक्रम नन्नावरे व प्रसाद चिने पाटील यांचे आहे. रंगमंच व्यवस्था अनिकेत खरे यांची आहे. नाटकाची वेशभूषा कविता देसाई यांची आहे. रंगभूषा नयना शिंदे यांची आहे. या नाटकाची निर्मिती लक्ष्मण कोकणे यांनी केली आहे.सदरील नाटक सर्वांसाठी खुले असणार आहे.

नाटकांसाठीच्या मोफत प्रवेशिका मिळवण्यासाठी इच्छुकांनी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे यांच्याशी ९८८१७३४८३८ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात येत आहे.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903


# गुणवंतांचा कौतुक सोहळा



**गंगापूर :** प्रयास कोचिंग क्लासेस, गंगापूर (संचालक श्रीमती पायघन मॅडम) वतीने इयत्ता दहावी / बारावी उत्तीर्ण 30 गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान व कौतुक सोहळा प्रयास क्लासेस गंगापूर येथे संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे सौ देसाई मॅडम (सेवा निवृत्त पर्यवेक्षिका श्रीमती रा. मा. धूत कन्या विद्यालय गंगापूर) ,श्री सरदार वाबळे सर (प्रसिद्ध शिववक्ते तथा सेवानिवृत्त शिक्षक लोकनेते साहेबराव पाटील डोणगावकर विद्यालय कायगाव) , श्री अतुल कुलकर्णी (संचालक गुरुकृपा कंप्युटर अकॅडमी गंगापूर) हे होते.सौ देसाई मॅडम यांनी विद्यार्थ्यांना शिष्त,सातत्य ह्या दोन गुणांनींच यश मिळवता येते तसेच करियर म्हणजे काय ह्या विषयी मार्गदर्शन केले.श्री सरदार वाबळे सर ह्यांनी मुलींनी अभ्यासा बरोबरच इतर गोष्टी ही शिकायला हव्यात तसेच मुलींनी धीट व्हायला हवे या विषयी मार्गदर्शन केले.अतुल कुलकर्णी यांनीही आपले मनोगत याप्रसंगी व्यक्त केले.गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृती चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रयास कोचिंग क्लासेसच्या सौ वैशाली मोरे (देशमुख) यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. सायली व संचिता यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री गणेश वाडेकर सर यांनी केले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# राष्ट्रीय लोक मोर्चा पक्षाची राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक संपन्न



**नवी दिल्ली :** येथे दिनांक १३ जून २०२६ रोजी राष्ट्रीय लोक मोर्चा पक्षाची राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. यावेळी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी निवडणूक पार पडली. या निवडणुकीत मा. उपेंद्र कुशवाह यांची पुन्हा राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

बैठकीत मार्गदर्शन करताना मा. उपेंद्र कुशवाह यांनी देश व राज्यांतील विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर आपली भूमिका मांडली. त्यांनी बिहारमधील बोधगया येथील मंदिराच्या व्यवस्थापनाचा अधिकार बौद्ध समाजाकडे सोपविण्याची मागणी केली. तसेच जनगणना करून लोकसंख्येच्या प्रमाणात मतदारसंघांची पुनर्रचना करण्याची आवश्यकता असल्याचे नमूद केले. ओबीसी, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती समाजावर होणारे अन्याय व अत्याचार रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्र व राज्य सरकारांकडून विकासकामे सुरू असली तरी आंतरराष्ट्रीय स्तरावरील युद्धजन्य परिस्थितीमुळे महागाईत वाढ झाली असून त्याचा परिणाम सर्वसामान्य नागरिकांवर होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रीय लोक मोर्चा पक्ष सध्या देशातील २२ राज्यांमध्ये आपले संघटन मजबूत करण्याचे कार्य करीत असून, आगामी काळात प्रत्येक राज्यात पक्षाचे संघटन अधिक बळकट केले जाईल. तसेच सर्व राज्यांतील निवडणुका लढविण्याच्या दृष्टीने पक्षाची तयारी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यकर्त्यांचे परिश्रम आणि जनतेचा पाठिंबा यांच्या बळावर आगामी निवडणुकांमध्ये पक्षाला यश मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बैठकीत देशहित, सामाजिक न्याय, संघटन विस्तार आणि आगामी निवडणुकांच्या रणनीतीसंदर्भातील विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १६ जून २०२६


## उमल फुला

उमल फुला रे
उमल फुला
घेऊ दे थोडासा
सुगंध मला

ताईने काढली
रांगोळी आवडीने
सजविन म्हणते
तुझ्या सजावटीने

उमलण्याची जरा
कर थोडी घाई
वेणीत माळीन
म्हणते आई

सूर्यकिरण पसरलेत
हो आता राजी
वाहीन म्हणते तुला
पुजेसाठी आजी

उमल फुला रे
उमल फुला
खेळू दे मजला
आनंदाचा झुला




**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## असे नको रे तू रुसू

येरे येरे मेघराजा,
असे नको रे तू रुसू.
असा अवेळी तापून,
नको आणू डोळ्या आसू. १

येरे येरे लवकर,
शेती लागली तहान.
आला नाही मेघराजा,
शेती ठेवू का गहाण. २

अशी वेळ माझ्यावर,
कधी नको बाबा आणू.
देतो सर्जा राजा साद,
नको माझ्यावर ताणू. ३

आता वेळेवर यावे,
नको नयनात पाणी.
असा रुसून बसता,
कसे गाणार मी गाणी. ४

येरे माझ्या मेघराजा,
आता तुझ्याशीच काम.
तुझ्याविना नाही मिळे,
शेतकरी बापा दाम. ५




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


# सत्यशोधक विद्यालयात प्रवेश उत्सव संपन्न



**गोषेगाव :** मानव विकास व पूर्ण निर्माण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन,जिल्हा जालना येथे शाळेच्या पहिल्याच दिवशी आलेल्या ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प तसेच पालकांचा पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या हस्ते रिबीन कापून त्याचे ढोलताशात प्रवेश उत्सवात स्वागत करण्यात आले. यावेळी निलेश कंकाळ, विजय कोलते श्रीकांत बंगाळे, गोविंद शिंदे, दत्तू सुलताने, आनंद गरुड , दिनेश जाधव , मुक्तार शेख, दादासाहेब पवार हे वर्गशिक्षक त्याच प्रमाणे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आलेल्या विद्यार्थ्यांवर फुलांचा वर्षाव केला. रांगोळी ने वेलकम लिहिण्यात आले होते सांस्कृतिक विभागाने मेहनत घेतली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य श्री. सुनीलजी वाकेकर साहेब तसेच संस्थेच्या सचिव श्रीमती जयश्रीताई बनकर मॅडम यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन राजीव पांढरे तर आभार योगेश पालोदकर यांनी मांडले. यावेळी आशा दांडगे, नंदकिशोर मापारी , संदीप मनगटे, सुमित श्रीवास्तव, पंजाब कांबळे , रमेश आमराव, राजीव दुधे, भाऊसाहेब घोडे यांच्यासह विद्यार्थी सर्व शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.


ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903


# ज्येष्ठ नागरिकांच्या अडचणीसाठी धावून येणार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि उपजिल्हाधिकारी

**बीड : (भगवंत पाळवदे) :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड व तहसील कार्यालय, बीड यांचे संयुक्त विदयमाने दिनांक १५ जून २०२६ रोजी सकाळी ठिक ११-३० वाजता प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण श्री.दिनेश पी.सुराणा यांचे मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालय, बीड येथे ज्येष्ठ नागरिकांकरिता सुविधा केंद्राची स्थापना करण्यात आली. सदर सुविधा केंद्राचे उदघाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डाॅ.वहाब ए.सयद यांचे शुभहस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमास अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक तहसीलदार चंद्रकांत शेळके, पीएलव्ही अशोक तांगडे व तत्वशील कांबळे, नायब तहसीलदार प्रशांत जाधवर, अण्णा जाधवर, महसुल सहाय्यक हेमलता परचाके, वैशाली बहिरवाळ व महेंद्र राउत, तर महसूल अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.सदर कार्यक्रमाचे उदघाटन कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डाॅ.वहाब ए.सय्यद व अति.जिल्हाधिकारी हरिश धार्मिक यांचे हस्ते करण्यात आले.सदर कार्यक्रमाचे उदघाटन प्रसंगी बोलताना डाॅ.वहाब ए.सयद यांनी सांगितले की, नालसाच्या ज्येष्ठ नागरिकांकरिता कायदेशीर सेवा योजना २०१६ या नुसार वृध्द नागरिकांना कायदेशीर मदत, महसूल विभागाच्या संदर्भातील व इतर शासकीय मदतींची लाभ मिळण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण काम करत आहे. तसेच कायदेशीर हक्कांचे संरक्षण मिळण्याकरिता या ठिकाणी ज्येष्ठ नागरिक सुविधा केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या केंद्राचा लाभ सर्व गरजू व ज्येष्ठ नागरिकांनी घ्यावा असेही आवाहन त्यांनी या कार्यक्रमा प्रसंगी केले. तसेच त्यांनी ज्येष्ठ नागरिकांना आॅनलाईन फ्राॅड संदर्भात सतर्क राहण्याबाबत सांगितले. त्यांनी ज्येष्ठ नागरिकांना कोणालाही ओटीपी, आपल्या अंगठयाचा ठसा देवू नका असे आवाहन केले. सदर कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांकरिता वैदयकीय तपासणी कॅम्प आयोजित करण्यात आला होता. सदर वैदयकीय कॅम्पमध्ये डाॅ.स्वप्ना घोळवे व डाॅ.भिसे यांनी सदर केंद्राच्या माध्यमातून या ठिकाणी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांची मोफत वैदयकीय तपासणी केली.सदर कार्यक्रमात बोलताना अति.जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी सांगितले की, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ज्येष्ठ नागरिकांचे मुलभूत हक्क मिळण्यासाठी संपूर्ण जिल्हयामध्ये कार्यरत असून कोणत्याही ज्येष्ठ नागरिकांना कायदेशीर अडचण असल्यास जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्याशी संपर्क साधून आपली अडचण सोडवून घ्यावी. ज्येष्ठ नागरिकांच्या अडचणीकरिता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय धावून येणार असून गरजूंनी याचा लाभ घ्यावा असेही आवाहन त्यांनी सर्व ज्येष्ठ नागरिकांना या कार्यक्रमा प्रसंगी केले.यावेळी तत्वशिल कांबळे यांनी बोलताना सांगितले की, ज्येष्ठ नागरिकांच्या घरगुती अडचणी कायदेशीर अडचणी, आरोग्याच्या समस्या, निवासाच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे विधीदूत कार्य करत आहेत. त्यामुळे ज्येष्ठांच्या अडचणीमध्ये मदत मिळते.सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक नायब तहसीलदार जाधवर यांनी केले. तर आभार प्रदर्शन नायब तहसीलदार आण्णा वंजारे यांनी केले.सदर कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे विधीदूत तत्वशिल कांबळे, अशोक तांगडे, मिथून जोगदंड, विधी महाविदयालयाचे इतर पीएलव्ही उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १६ जून २०२६

# कृत्रिम बुद्धिमत्ता : सामाजिक आणि सांस्कृतिक वास्तवाचे प्रतिबिंब



**स**माजशास्त्रज्ञांनी ऐतिहासिकदृष्ट्या मध्यम वर्गाकडे केवळ एक आर्थिक गट म्हणून पाहिलेले नाही. हा एक असा सामाजिक गट आहे जो उपभोग, आकांक्षा आणि सामाजिक गतिशीलता यांसारख्या वैशिष्ट्यांनी ओळखला जातो. 2000 च्या दशकात, विशेषतः शहरी भागांमध्ये, मध्यम वर्गाचा आकार वाढला. पूर्वी या क्षेत्रावर उच्च जातींचे वर्चस्व असले, तरी अलीकडच्या काळात इतर जातींमधील लोकांनीही हळूहळू यात स्थान निर्माण केले आहे. शिक्षण आणि माहिती तंत्रज्ञान (IT) क्षेत्राशी संबंधित विविध प्रकारच्या व्यवसायांनी — जसे की अभियांत्रिकी, संगणक विज्ञान, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, डेटा सायन्स, बिझनेस ॲनालिटिक्स, प्रॉडक्ट मॅनेजमेंट इत्यादी — नवीन मध्यमवर्गाच्या उदयामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. आयटी क्षेत्रातील या नोकऱ्यांव्यतिरिक्त, वित्त (फायनान्स), बँकिंग, रिअल इस्टेट आणि बिझनेस प्रोसेसिंग यांसारख्या क्षेत्रांनीही समाजातील या घटकाला आर्थिक दृष्ट्या भरभराट होण्यास मदत केली आहे.

आयटी क्षेत्रातील या नोकऱ्या नवीन भारताच्या आकांक्षा आणि सर्वसमावेशक जीवनशैलीची (कॉस्मोपॉलिटनिझम) प्रतीके ठरल्या असून त्यांनी सामाजिक प्रगतीची संधी, प्रतिष्ठा आणि स्थिरता प्रदान केली. तांत्रिक शिक्षणाची वाढती मागणी पाहून स्वातंत्र्यानंतर देशात आयआयटी (IIT) सारख्या मोठ्या संस्था सुरू करण्यात आल्या. या संस्था देशाच्या प्रगतीचे आणि गुणवत्तेचे प्रतीक बनल्या. त्यानंतर खाजगी इंजिनिअरिंग कॉलेजेस आणि कोचिंग क्लासेसचा पूर आला. या नामांकित संस्थांमुळे नवीन मध्यमवर्गाला समाजात एक वेगळी ओळख आणि प्रतिष्ठा मिळाली

**आयटी क्षेत्रातील भरभराट आणि नव मध्यमवर्ग**

सामाजिक मानववंशशास्त्रज्ञ कॅरोल उपाध्याय यांच्या संशोधनातून हे स्पष्ट झाले आहे की, आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची सामाजिक पार्श्वभूमी ही प्रामुख्याने शहरी, मध्यमवर्गीय आणि उच्च किंवा मध्यम जातींमधील लोकांची राहिली आहे. आयटी क्षेत्रातील या भरभराटीमुळे बेंगळुरू, हैदराबाद आणि गुडगाव यांसारखी शहरी तंत्रज्ञान केंद्रे (टेक्नॉलॉजी हब्स) उदयास आली. हेमांगिनी गुप्ता यांचे 2024 मधील 'एक्सपेरिमेंटल टाइम्स: कॅपिटलिझम अँड फेमिनिस्ट फ्यूचर्स इन इंडिया' हे पुस्तक बेंगळुरूचे 'बॅकएंड' आयटी कामाचे ठिकाण ते उद्योग आणि नवोपक्रमाचे एक महत्त्वाकांक्षी जागतिक शहर यांत झालेले रूपांतर दर्शवते. तंत्रज्ञान, शिक्षण आणि मध्यमवर्ग यांच्यातील या परस्परसंबंधाने शहर परिसराच्या परिवर्तनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सॉफ्टवेअर उद्योगामुळे सामाजिकदृष्ट्या प्रगतीशील अशा एका नवीन व्यावसायिक वर्गाचा उदय झाला.

**एआयचा मोठा धोका**

पूर्वी तंत्रज्ञानाने एका नवीन सामाजिक वर्गाच्या उदयात भूमिका बजावली होती. परंतु अलीकडील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) वाढत्या प्रभावामुळे लोकांच्या नोकऱ्या (कार्यबळाची रचना) अस्थिर होण्याचा धोका निर्माण झाला आहे. व्यावसायिकांना आता बदलत्या आर्थिक आणि रोजगाराच्या पद्धतींशी जुळवून घ्यावे लागत आहे, जिथे तंत्रज्ञान आता कामगारासाठी वरदान राहिलेले नाही. त्यांना एका येऊ घातलेल्या, अनिश्चित तंत्र-भविष्याचा सामना करावा लागत आहे, ज्यामध्ये ऑटोमेशन त्यांच्या नोकऱ्यांची जागा घेणार आहे. ज्या नोकऱ्यांमध्ये दररोज ठराविक आणि एकाच प्रकारचे काम करावे लागते, अशा नोकऱ्या AI मुळे सर्वात आधी बंद होतील.

उद्योग क्षेत्रातील अहवालांनुसार, जागतिक तसेच राष्ट्रीय पातळीवर प्रवेश-स्तरीय भरतीची गती आधीच मंदावली आहे. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. उदाहरणार्थ, ऑक्टोबर 2025 मध्ये ॲमेझॉनने 30,000 हून अधिक कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले आणि जानेवारी 2026 मध्ये आणखी एक कपातीची फेरी राबवली. कंपन्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मुळे वाढलेली उत्पादकता आणि खर्चात झालेली बचत यांचा फायदा होत असताना, कामगारांचे भविष्य मात्र अनिश्चित बनत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता कर्मचारी टिकवून ठेवणे आणि त्यांचे कल्याण यापेक्षा उत्पादकता व नफा यांना अधिक प्राधान्य देते. कमी देखभाल आणि सेवा खर्च लागणारे अधिक कार्यक्षम साधन म्हणून त्याकडे पाहिले जाते.

इतिहासात नव-उदारमतवादी अर्थव्यवस्थांमध्ये, जिथे कामगार-संबंधित उपक्रमांवर विविध बंधने असतात, तिथे कंपन्या भरभराटीला आल्या आहेत. विशेष म्हणजे, माहिती-तंत्रज्ञान (IT) क्षेत्रातील अनेक कर्मचाऱ्यांनी स्वतःला "कामगार" म्हणून वर्गीकृत करण्यास विरोध केला आहे. त्यांना वाटत होते की, त्यांची नोकरी ही गुणवत्ता, कौशल्य आणि शिक्षण यांची ओळख आहे आणि त्यामुळे ते शारीरिक श्रम करणाऱ्या कामगारांपेक्षा वेगळे आहेत. परंतु कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे होणाऱ्या रोजगारकपातीने त्यांच्या कामातील असुरक्षितता आणि अनिश्चितता उघड केली आहे. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या माहितीनुसार, एप्रिल 2026 पर्यंत बेरोजगारीचा दर 5.2 टक्के आहे. याचा अर्थ असा की रोजगाराच्या किंवा पुनर्नियुक्तीच्या प्रतीक्षेत मोठ्या प्रमाणावर तांत्रिक कौशल्य असलेले लोक उपलब्ध आहेत. कंपन्यांसाठी हे अधिक शोषणाच्या संधी निर्माण करणारे ठरू शकते. मात्र AI चे संकट त्यांच्यासमोरही मोठे आहे.

AI मुळे भांडवलधारक आणि मध्यमवर्गीय पांढरपेशी कर्मचाऱ्यांमधील वर्गीय दरी वाढण्याची शक्यता आहे. त्याचवेळी AI चा धोका दुर्मिळ सरकारी नोकऱ्यांसाठीची स्पर्धाही अधिक तीव्र करेल. आपण आधीच पाहत आहोत की दरवर्षी वाढत्या संख्येने IIT पदवीधर प्रशासकीय आणि नोकरशाही क्षेत्रातील नोकऱ्यांकडे वळत आहेत. येत्या काही वर्षांत हा कल आणखी वाढू शकतो. आर्थिक परिणामांव्यतिरिक्त, सरकारी सेवेत काम करण्याचे सामाजिक परिणामही आहेत. विशेषतः पुरुषांसाठी, सरकारी नोकरीमुळे विवाहबाजारात त्यांची सौदेबाजीची क्षमता आणि सामाजिक प्रतिष्ठा वाढते. AI-प्रेरित रोजगारसंकटामुळे लोक अधिक स्थिर आणि सुरक्षित समजल्या जाणाऱ्या नोकऱ्यांकडे वळतील. सामाजिक ओळखी आणि प्रतिष्ठेवर आधारित समाजात खासगी क्षेत्रावर सहज विश्वास ठेवणे कठीण असते. रोजगारातील ही नवी अस्थिरता खासगी क्षेत्राबद्दलची शंका आणि अविश्वास अधिक दृढ करेल.

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मुळे मध्यमवर्गीय पांढरपेशी नोकऱ्यांवर निर्माण होणारा धोका हा संगणकीकरण आणि स्वयंचलनाच्या प्रारंभिक काळातील परिस्थितीची आठवण करून देतो. इतिहास सांगतो की, श्रमबाजारातील मोठ्या बदलांचा सर्वप्रथम आणि सर्वाधिक फटका समाजातील तुलनेने असुरक्षित घटकांना बसतो. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राने महिलांसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून दिल्या, त्यांना घराबाहेर पडून आर्थिक स्वावलंबन प्राप्त करण्याचा मार्ग खुला केला. मात्र, तांत्रिक परिवर्तन, आर्थिक मंदी किंवा संस्थात्मक पुनर्रचना यांसारख्या प्रक्रियांमध्ये महिलांची रोजगारस्थिती अधिक अस्थिर ठरत आली आहे.

महिला कर्मचारी मोठ्या प्रमाणावर प्रवेश-स्तरीय आणि नियमित प्रशासकीय स्वरूपाच्या पदांवर कार्यरत असतात. AI-आधारित स्वयंचलनामुळे याच प्रकारच्या नोकऱ्या सर्वाधिक धोक्यात आल्या आहेत. परिणामी रोजगाराच्या संधी कमी झाल्यास महिलांवर लवकर विवाह करण्याचा किंवा घरगुती जबाबदाऱ्यांमध्येच मर्यादित राहण्याचा सामाजिक दबाव वाढू शकतो. ज्या समाजव्यवस्थेत महिलांच्या श्रमाचे महत्त्व दुय्यम मानले जाते, तेथे त्या पुन्हा पारंपरिक लैंगिक भूमिकांच्या चौकटीत अडकण्याची शक्यता अधिक असते.

याशिवाय, रोजगाराच्या अनिश्चिततेमुळे कुटुंबे मुलींच्या शिक्षणात, विशेषतः विज्ञान, तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकीसारख्या पुरुषप्रधान क्षेत्रांतील शिक्षणात गुंतवणूक करण्यास मागे-पुढे पाहू शकतात. कार्यस्थळांवरील संस्कृती, पदोन्नतीची व्यवस्था आणि भरती प्रक्रियेत खोलवर रुजलेला संरचनात्मक भेदभाव यांमुळे महिलांना उच्च व्यवस्थापकीय व नेतृत्वाच्या पदांपर्यंत पोहोचणे आधीच कठीण गेले आहे. जर AI प्रणालींना पक्षपाती किंवा असमतोल माहितीवर प्रशिक्षित केले गेले, तर त्या विद्यमान भेदभावाला अधिक बळ देऊन लिंगाधारित विषमता आणखी तीव्र करण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. अशा परिस्थितीत AI हे केवळ तांत्रिक नव्हे, तर सामाजिक न्याय आणि लैंगिक समतेसमोरील एक गंभीर आव्हान ठरू शकते.

**उपाय काय?**

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्माण होणाऱ्या रोजगारविषयक संकटावर उपाय म्हणून कौशल्यविकास (Skilling) आणि पुनःकौशल्यविकास (Reskilling) यांचा वारंवार उल्लेख केला जातो. तथापि, हा उपाय प्रत्यक्षात कितपत प्रभावीपणे राबविता येईल, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. भारताच्या अलीकडील शैक्षणिक धोरणांमध्ये कौशल्याधारित शिक्षणाला विशेष महत्त्व देण्यात आले असले, तरी AI मुळे निर्माण होणाऱ्या व्यापक रोजगारसंकटाला केवळ कौशल्यविकासाच्या माध्यमातून तोंड देता येईल का, याचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

आज अनेक तरुणांनी आपले औपचारिक शिक्षण पूर्ण केलेले असले, तरी त्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नव्या डिजिटल तंत्रज्ञानाशी संबंधित कौशल्यांचे पुरेसे प्रशिक्षण मिळालेले नाही. बदलत्या श्रमबाजाराच्या अपेक्षांशी जुळवून घेणे आणि आयुष्याच्या पुढील टप्प्यांवर नवीन कौशल्ये आत्मसात करणे ही सोपी प्रक्रिया नाही. विशेषतः कौटुंबिक जबाबदाऱ्या, मुलांची देखभाल किंवा काळजीवाहू भूमिका पार पाडणाऱ्या महिलांसाठी अशा संधींपर्यंत पोहोचणे अधिक कठीण ठरू शकते.

AI मुळे होणारी रोजगारकपात ही जरी सर्वसामान्य समस्या असली, तरी तिचे परिणाम समाजातील सर्व घटकांवर सारखे पडत नाहीत. वर्ग, जात, लिंग, शिक्षण आणि आर्थिक स्थिती यांनुसार या परिणामांची तीव्रता बदलते. त्यामुळे चर्चा केवळ कौशल्यविकासापुरती मर्यादित न राहता अधिक मूलभूत प्रश्नांकडे वळणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालींवर नियंत्रण कोणाचे आहे? डेटा आणि भांडवलाची मालकी कोणाकडे केंद्रित आहे? वाढलेल्या उत्पादकतेचा आर्थिक लाभ कोणाला मिळतो? आणि तंत्रज्ञानामुळे निर्माण होणाऱ्या संपत्तीचे तसेच रोजगारातील जोखमींचे वाटप कसे होते?

या प्रश्नांची उत्तरे शोधल्याशिवाय AI च्या सामाजिक परिणामांचे संपूर्ण आकलन होऊ शकत नाही. कारण कृत्रिम बुद्धिमत्ता ही केवळ तांत्रिक साधन नसून ती समाजातील विद्यमान सत्तासंबंध, पूर्वग्रह, विषमता आणि सांस्कृतिक मूल्ये यांच्याशी जोडलेली असते. म्हणूनच AI प्रणाली सामाजिकदृष्ट्या तटस्थ नसतात; उलट त्या आपल्या समाजातील वास्तवांचे, असमानतेचे आणि सांस्कृतिक संरचनांचे प्रतिबिंब बनून कार्य करतात.

**भाषांतर : प्रियदर्शन भवरे**

**पूर्व प्रसिद्धी : आऊटलूक, जून 22, 2026**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १६ जून २०२६


# जोपर्यंत जर्मनी बरबाद होत नव्हता

जोपर्यंत जर्मनी बरबाद होत नव्हता,
तोपर्यंत हिटलरमध्ये लोकांना देशभक्ती दिसत होती,
पण गर्जणाऱ्या भाषणांच्या आवाजात,
भविष्यातील संकटांची चाहूल हरवत होती.

राष्ट्रप्रेमाच्या नावाखाली,
अभिमानाचा ज्वालामुखी पेटत गेला,
आणि प्रश्न विचारणारा प्रत्येक आवाज,
हळूहळू अंधारात गडप होत गेला.

विजयाच्या स्वप्नांनी भारावलेले जनसमुदाय,
टाळ्यांच्या गजरात सत्य विसरत गेले,
सत्तेच्या चकाकत्या प्रकाशामागे,
विनाशाचे सावट दडून बसलेले होते.

जेव्हा रणांगणावर रक्त वाहू लागले,
जेव्हा घराघरांत दु:खाचे ढग दाटले,
तेव्हा समजले की अंधभक्तीच्या वाटेवर,
किती भयंकर काटे पेरले गेले.

देशभक्ती म्हणजे द्वेष नव्हे,
देशभक्ती म्हणजे विवेकाची ज्योत;
नेत्यावर प्रेम असावे जरूर,
पण सत्यावर असावी सर्वात मोठी निष्ठा.

इतिहास शिकवतो एकच धडा—
टाळ्यां थाळ्याच्या गजराने सत्य बदलत नाही,
नेत्याचे मूल्यमापन त्याच्या घोषणांनी नव्हे,
तर त्याच्या कृतींच्या परिणामांनी होते.

म्हणून राष्ट्रप्रेम जपा,
पण विचारांची दारे उघडी ठेवा;
कारण जेव्हा प्रश्न विचारणे थांबते,
तेव्हाच विनाशाची सुरुवात होते.



**डॉ. बाळासाहेब लिहिणार**


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com


# आता तरी मुख्यमंत्री व राज्यातील खासदारांनी स्मार्ट मिटर बाबत व्यक्त व्हावे - राजेंद्र दाते पाटील



**मुंबई (प्रतिनिधी)** खुप पूर्वीच टी ओ डी तथा स्मार्ट मीटर राज्य भरात रद्द करून न्याय द्यावा अशी जोरदार जनहिताची मागणी जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्राचे अध्यक्ष आणि पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्यमंत्र्या कडे केली असता या मागणीची गांभीर्याने दखल घेत हा प्रस्ताव उर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला यांचे कडे पुढील कारवाई साठी पाठवला होता,आता तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्यातील सर्वच खासदारांनी स्मार्ट मिटर बाबत व्यक्त व्हावे अशीही मागणी त्यांनी केली आहे.त्या वेळी मुख्यमंत्र्यांनी दखल घेऊन स्मार्ट मीटर कुठेही बसवणार नाही हा मुख्यमंत्र्यांचा निर्वाळा असतांना आणि ही बाब भर सभागृहात स्पष्ट झालेली आहे परंतु वरिष्ठ अधिकारी सर्व सामान्य ग्राहकांची दिशाभुल करत आहेत ! असे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी म्हंटले आहे.आपल्या सविस्तर निवेदनात त्यांनी नमुद केले होते की, टी.ओ.डी तथा स्मार्ट मीटर राज्यभरात रद्द करून न्याय द्यावा अशी मागणी मुख्यमंत्र्या कडे केली असता या मागणीची गांभीर्याने दखल घेत हा प्रस्ताव उर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला यांचे कडे पुढील कारवाई साठी पाठवला होता. मुख्यमंत्र्यांनी घेतली दखल ! स्मार्ट मीटर कुठेही बसवणार नसल्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा निर्वाळा असुन तशी कबुलीच एका सादरी करणात स्पष्ट होत असताना ही काही अधिकारी अधिकची दिशाभुल करण्याचे काम करीत असुन नव्याने ही बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कडे मांडावी लागेल असेही जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणाले. सध्या जनहीत याचीका मधुन हे प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे न्यायालयामधील या जनहित याचिकेत केंद्र शासनाच्या स्मार्ट ग्रिट मिशन मार्गदर्शक तत्वे 18 जानेवारी 2025, तसेच सी इ ए म्हणजेच मीटरची स्थापना आणि संचलन सुधारणा नियम 2019,व एमईआरसी पुरवठा नियम 2021 या विषयावर चर्चा करण्या साठी सन्माननीय उच्च न्यायालय उत्तर अपेक्षित करीत आहेत. मुख्यमंत्री यांचे कडे महत्वपूर्ण मागणी याच प्रमाणे त्यांनी महत्त्वपूर्ण मागणी मुख्यमंत्री यांचे कडे केली होती त्यात सुध्दा त्यांनी नमुद केले होते की,500 युनिट पर्यंत वीजबील माफ करावे आणि याची योग्य ती दखल घेऊन हा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माफी साठी प्रस्ताव उर्जा विभागाकडे पाठवला होता. जनहितार्थ अत्यंत अभ्यासु निवेदन खास बाब म्हणजे आपल्या अत्यंत अभ्यासु निवेदनात शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केलेले आहे की, अगदी सुरुवाती पासुनच स्मार्ट मीटर, टीओडी मीटर बसवण्या च्या प्रक्रियासाठी देश भरासह संपुर्ण महाराष्ट्र विरोध करीत असुन कमी वीज वापर णाऱ्या घरगुती ग्राहकांना पहिल्या वर्षी 10 टक्के सवलत, स्मार्ट मीटर वापरणाऱ्यांना दिवसा वीज वापरावर अतिरिक्त 10 टक्के टीओडी लावण्याचे धोरण नागरिकांना वेठीस धरणारे ठरणारअसल्याचे त्यांनी नमुद करून हा प्रश्न उपस्थित केला की, जर का हरित ऊर्जा खरेदी तून आगामी 5 वर्षांत वीज खरेदीचे 66 हजार कोटी रुपये वाचणार असतील तर वीजदरात 500 युनिट पर्यंत सामाईक असा (युनिफॉर्म) उपाययोजना का केल्या जात नाही ? असा परखड सवाल उपस्थित करून 100 पासुन 300 युनिट पर्यंत फक्त सहा पैशांची सवलत? याला कशाचे द्योतक म्हणावे ?असा जळ जळीत सवाल देखील जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी उपस्थित केला होता.राज्यात पहिल्यांदाच घरगुती, औद्योगिक,व्यावसायिक वीजदर पहिल्या वर्षी 10 टक्के आणि पाच वर्षांत 26 टक्के कमी होणार आहे. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने (एमईआरसी) महा वितरणच्या याचिकेवर दिलेल्या आदेशा मुळे सध्या असलेले 101 ते 300 - 13.23 रुपये 2025- 2026 मध्ये 13.17 होतील तर सध्याचे 301 ते 500 युनिट 17.78 एवढी असून ती 2025- 2026वर्षात 17.56 एवढी होणार तर 500 युनिट च्या पुढील सध्या 19.23 रुपये तर वर्ष 2025- 2026 या वर्षात 19.15 म्हणजे फक्त आठ पैशांचा फरक असणार आहे आणि हीच बाब शासनाची काय दृष्टी आहे हे अभिप्रेत करणारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते.पुढे डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केले होते की, राज्यातील महावितरण कंपनीने वीजदर कमी करण्यासाठी याचिका केली असता त्यावर एम.ई. आर.सीने जो आदेश दिला आहे तो मुळात व्यापक हिताचा ठरतच नसुन या आदेशाचा लाभ घरगुती वापर करणाऱ्या 100 युनिटच लक्षात घेत औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांना हा लाभ होताना भरीव फायदा थेट दिसतच नाही. पुढे त्यांनी निवेदनात स्पष्ट केले होते की,तत्कालीन महा वितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेशचंद्र यांनी सांगितल्या प्रमाणे स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरासाठी दहा टक्केअतिरिक्त टीओडी सवलत व सौरऊर्जा निर्मिती करणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रोत्साहन ही या आदेशाची वैशिष्ट्ये सिद्धच होत नाहीत.आगामी पाच वर्षांत जर का महावितरणचे वीज खरेदी चे 66 हजार कोटी रुपये वाचणार असतील तर त्याचा फायदा सर्वच ग्राहकांना भरीव स्तरावर का नाही ? हा महत्वाचा सवाल जेष्ठअभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी उपस्थित केला होता व नमुद केले होते की, सन 2030 पर्यंत राज्याची विजेची क्षमता 81 हजार मेगावॅट होण्यासाठी 45 हजार मेगा वॅटचे वीज खरेदीचे करार केले. त्यापैकी 2 हजार मेगावॅट वीज रिन्युएबल अर्थात नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांमधून मिळणार आहे असे असेल आणि ती अत्यंत किफायतशीर दरात मिळणारअसल्यास पाच वर्षांत 66 हजार कोटी रुपये वाचण्याच्या दाव्याचा फायदा सर्व सामान्य विद्युत ग्राहकांना का नाही ? असे ही त्यांनी नमुद करून महावितरण मुंबईतील काही भागात तर अदानी व टोरेंटो या खासगी वीज कंपन्यांनी एकमेकांच्या परवाना क्षेत्रात वितरण परवाना मिळविण्या साठी आयोगा पुढे याचिका सादरकेल्या आहेत त्या काही जनहिता साठी अजिबात नाही असे नमुद करून पुढे जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी अत्यंत मुद्देसुद निवेदन केले असुन आयोगाने 29 मार्च रोजी एक एप्रिल पासूनचे नवीन वीजदर जाहीर केले होते. महावितरणने 48 हजार कोटी रुपयांची तूट येणार असल्याने वित्तीय ताळे बंदा तून आयोगापुढे मांडण्यात आले होते व त्यानुसार महसूल वाढ देण्याची मागणी महा वितरणने केली होती हे कशा च्या बळावर मांडले होते ? हा देखील अनुत्तरित सवाल आहे. एकंदरीत या निकालाचा अधिकचा व्यापक विचार करून सामान्य गोरगरीब आणि शेतकरी यांच्या उत्पन्नाचा अधिक बारकाईने विचार करून पुर्नविचार करावा आणि स्मार्ट (टी ओ डी )मीटर लावण्याची प्रकिया रद्द करून 500 युनिट पर्यंतचे विद्युत बील कायम स्वरुपी माफ करावे अशी जोरदार मागणी जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्राचे अध्यक्ष व पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केलेली आहे.खाजगी कंपन्यांना परवान्या मुळे मनमानी वाढेल म्हणून या कंपन्यांना वीज वितरणाचा परवाना मंजूर झाल्यास शासनाच्या महावितरण कंपनीस दुय्यम स्थान प्राप्त होईल आणि खाजगी कंपन्यांची मनमानी वाढुन कालांतराने प्रचंड वीज बीलवाढ होऊन सर्व सामान्य नागरीकांना आर्थिक भुर्दंड वाढणार आहे ही अत्यंत महत्वाची अभ्यासु बाब त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्षात आणुन देत नमुद केले होते की, विद्युत निर्मिती जरी खाजगी कंपन्यांनी केली तरी वितरण व्यवस्था फक्त आणि फक्त महावितरण कंपनी कडेच असावी त्या स्थितीत कोणाची वीज घ्यायची किंवा कुठल्या कंपनीचे वीज मीटर घ्यायचे ही सक्ती वाढेल म्हणुन जनहितार्थ हा होऊ घातलेला निर्णय शासनाने तत्काळ अमान्य करून रद्द करावा अशीही मागणी राज्याच्या मुख्यमंत्र्यां कडे त्यांनी केली असुन या विषयाचे गांभीर्य त्यांनी लक्षात घेतल्याचे स्पष्ट होत आहे. या बाबत जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांना मुख्यमंत्र्यांचा मेल प्राप्त झाला असल्याची बाब महत्वाची ठरत आहे. सध्याची गंभीर माहिती व बाब अशी आहे की 23मे 2022 रोजी केंद्र शासनाने याच अधि सूचनेत सुधारणा केली आणि 17ऑगस्ट 2021 च्या मूळ अधिसूचनेला मागे घेतले असुन(विथड्रॉन) केल्याचे स्पष्ट होत असुन असुन नव्या 2022 च्या अधिसूचनेत वेळसीमा समान राहिली,असे स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे.जनआंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्राचे अध्यक्ष आणि शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केले की, केंद्रीय ऊर्जा मंत्र्यांनी एक स्पष्टीकरण केले होते व त्यात नमुद केले आहे की,ग्राहकां साठी प्रीपेड स्मार्ट मीटर्स अनिवार्य नाहीत असे केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहर लाल यांनी स्पष्ट केलेले असुन सर्व ग्राहकांसाठी प्रीपेड इलेक्ट्रिक स्मार्ट मीटर्स अनिवार्य नाहीत. लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासा दरम्यान विचारले ल्या पूरक प्रश्नांना उत्तर देताना सुद्धा ते म्हणाले होते की, जर ग्राहकांनी प्रीपेड स्मार्ट मीटर्सचा पर्याय निवडला,तर त्याचा फायदा केवळ ग्राहकांनाच नाही, तर संबंधित राज्ये आणि वीज वितरण कंपन्यां नाही होईल. त्यांनी सांगितले होते की, अनेक राज्यांमध्ये स्मार्ट प्रीपेड मीटर्स बसवण्यात आले आहेत. मंत्र्यांनी हे देखील स्पष्ट केले की, प्रीपेड इलेक्ट्रिक स्मार्ट मीटर्स कोणत्याही ग्राहकांवर बळजबरीने लादले जात नाहीत, कारण ही एक ऐच्छिक सुविधा आहे पुढे त्यांनी असेही म्हंटले आहे की,ज्या ठिकाणी प्रीपेड प्रणाली लागू करण्यात आली आहे,तिथे कंपन्यांचे नुकसान थांबले असून त्या नफ्यात आल्या आहेत.आता ग्राहकांच्या फायदा व नुकसानी चा विचार अजिबात न करता खाजगी कंपन्या आणि त्यांचे व्यवस्थापन यांच्या आर्थिक फायद्यासाठी स्मार्ट मिटरचा (टी ओ डी)फास सर्वसामान्य नागरिकांच्या आणि ग्राहकांच्या गळ्या भवती आवळल्या जात असुन केंद्रीय मंत्र्यांनी त्या वेळी दिलेल्या माहिती नुसार सध्या वीज वितरण कंपन्यांचे नुकसान जवळपास सात लाख कोटी रुपयां पर्यंत पोहोचले आहे. बिलांची योग्य वसुली सुनिश्चित करण्यासाठी प्रीपेड स्मार्ट मीटर्स आणले जात असल्याचे त्यांनी सांगितले आणि यातच सर्व बाबी स्पष्ट होत असल्याची बाब जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्राचे अध्यक्ष आणि शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी पुढे आणली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १६ जून २०२६


## दौलताबाद येथे देवगिरी विद्यालयात उत्साहात प्रवेशोत्सव

**दौलताबाद (जावेद अहमद) :** उन्हाळी सुट्टीनंतर नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभानिमित्त देवगिरी विद्यालय, दौलताबाद येथे सोमवारी सकाळी ८ वाजता मुख्याध्यापक ईश्वर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे फुलांची उधळण करून स्वागत करण्यात आले. त्यानंतर दौलताबाद गावातून सनई-चौघड्यांच्या गजरात विद्यार्थ्यांची प्रभातफेरी काढण्यात आली. कार्यक्रमात गणवेश परिधान करून आलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. तसेच शासनाकडून प्राप्त झालेली मोफत पाठ्यपुस्तकेही विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आली.प्रवेशद्वार व शालेय मैदान आकर्षक रांगोळ्यांनी सजविण्यात आले होते. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या वर्गखोल्यांची सुंदर सजावट केली होती. उत्कृष्ट सजावट केलेल्या वर्गांना विशेष बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. या प्रवेशोत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये नव्या शैक्षणिक वर्षाबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी शाळेचा पहिला दिवस आनंदोत्सवाप्रमाणे साजरा केला. कार्यक्रमास पालकांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.






## प्रशिक्षणार्थी पर्यटन मार्गदर्शकांनी जाणून घेतला ग्वाल्हेरचा ऐतिहासिक वारसा



**दौलताबाद (जावेद अहमद) :** महाराष्ट्रातील प्रशिक्षणार्थी मार्गदर्शक ग्वाल्हेरच्या वारशाबद्दल इतिहास जाणून घेतला. महाराष्ट्रातील प्रशिक्षणार्थी पर्यटन मार्गदर्शकांना ग्वाल्हेरच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाची ओळख करून देण्यासाठी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टुरिझम अँड ट्रॅव्हल मॅनेजमेंट (आयआयटीटीएम) ने एक शैक्षणिक क्षेत्रभेट आणि हेरिटेज वॉकचे आयोजन केले होते. प्रशिक्षण कार्यक्रमाचा भाग म्हणून या उपक्रमात 45 प्रशिक्षणार्थी मार्गदर्शकांनी सहभाग घेतला आणि त्यांना शहराचा गौरवशाली वारसा जवळून समजून घेण्याची संधी मिळाली. महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या सहकार्याने आयोजित या हेरिटेज वॉकचे नेतृत्व तज्ज्ञ डॉ. कामाक्षी माहेश्वरी यांनी केले. मोती महल संकुलात आयोजित केलेल्या सुमारे दोन तासांच्या या कार्यक्रमादरम्यान, सहभागींना ग्वाल्हेरच्या स्थापत्य आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांची ओळख करून देण्यात आली. आयआयटी-टीएमतर्फे आयोजित शैक्षणिक क्षेत्रभेट आणि हेरिटेज वॉक दरम्यान काढलेला ग्रुप फोटो. पर्यटक आणि स्थानिक लोकांकडून याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जात असे.पर्यटक उपसंचालक विजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबविले जात आहे महाराष्ट्र पर्यटन विभागाचे जिल्हा पर्यटन अधिकारी अझीमुद्दीन शेख हेही उपस्थित होते. बैजाताल हे तत्कालीन शहरी नियोजन आणि जलसंधारण प्रणालीचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे: डॉ. कामाक्षी म्हणाल्या की, बैजाताल हे केवळ एक जलाशय नाही, तर तत्कालीन शहरी नियोजन आणि जलसंधारण प्रणालीचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. हे नियोजन आणि जलसंधारणाचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. मोती महल, चारबाग शैलीतील उद्याने आणि बैजाताल मिळून एक भव्य भूदृश्य तयार करतात, जे शिंदे शासकांची स्थापत्यशास्त्रीय दूरदृष्टी, पर्यावरणाची जाण आणि सौंदर्यदृष्टी प्रतिबिंबित करते. आजही, बैजाताल ग्वाल्हेरच्या ऐतिहासिक अस्मितेचा आणि सांस्कृतिक वारशाचा एक महत्त्वाचा भाग आहे. याला वारशाचे प्रतीक मानले जाते. मोती महल त्याच्या चारबाग रचनेसाठी आणि 300 हून अधिक खोल्यांसाठी ओळखला जातो. प्रशिक्षण समन्वयक डॉ. चंद्रशेखर बरुआ म्हणाले की, पर्यटक मार्गदर्शक प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश सहभागींना केवळ सैद्धांतिक ज्ञान देणे हा नाही, तर त्यांना प्रत्यक्ष स्थळांवर नेऊन पर्यटन विवेचन आणि वारसा संवर्धनाची ओळख करून देणे हा देखील आहे.


